**१ वर्षाच्या आतील जन्म-मृत्यूबाबतची नोंदणी करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक जमृनों-२५२५/ई.ऑ.९९११८१/प्र.क्र.२२/कु.क.**

१० वा मजला, बी विंग,गो. ते. रुग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, लो. टि. मार्ग, मुंबई -०१
दिनांक: २९ मे, २०२५

**वाचा -**

१. विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दि. ११.०८.२०२३ रोजीची अधिसूचना.
२. शासन समक्रमांक दि. १२.०३.२०२५ रोजीचा शासन निर्णय.

**परिपत्रक -**

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० अन्वये जन्म व मृत्यू नोंदणी करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मध्ये दि. ११.०८.२०२३ रोजी केलेल्या सुधारणेनुसार जन्म व मृत्यूची घटना घडल्यापासून ७ दिवसाच्या आतील घटनेबाबत निबंधकाला संबंधिताकडून कळविण्यात आल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र **विनामूल्य,** कलम १३(१) अन्वये घटना घडल्यापासून ७ ते ३० दिवस या कालावधीतीकरिता **विलंब फी** आकारुन प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. तसेच कलम १३(२) अन्वये घटना घडल्यापासून ३० दिवसानंतर आणि १ वर्ष या कालावधीमध्ये स्वसाक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या आधारे आणि जिल्हा निबंधक / विहित प्राधिकरणाच्या लेखी आदेश व विहित फी अदा केल्यानंतर असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. तद्वतच कलम १३(३) अन्वये १ वर्षाच्या कालावधीनंतरची नोंद जिल्हा दंडाधिकारी/उप विभागीय अधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडून नियुक्त अन्य कार्यकारी दंडाधिकारी यांनी खातरजमा करून व त्याची सत्यता पडताळून आणि विहित फी आकारून जन्म व मृत्यू नोंद घेण्याबाबत तरतूद आहे. तसेच अशा विलंबाने नोंद घेण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि. १२.०३.२०२५ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

३. या परिपत्रकाद्वारे सर्व निबंधकांना परत सूचित करण्यात येते की, अधिनियमातील आणि शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व विशेषत: विलंबित जन्म व मृत्यूच्या नोंदी घेताना दि. १२.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियमोचित कार्यपध्दती अवलंबण्याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०५२९१४५५५३०७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VAIBHAV GAJANAN KOSHTI

Digitally signed by VAIBHAV GAJANAN KOSHTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=5749df8e46703e97e25555afe696d0a51badfa2373ccdc83593e18af18e92f1a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47C0ABB5437C6B09C621CCA6C499475684F37EA0F5529DD3EF3D6E6B3326E747, cn=VAIBHAV GAJANAN KOSHTI
Date: 2025.05.30 10:34:54 +05'30'

(वैभव ग.कोष्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत

१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (सर्व)

३. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. संचालक-१, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
५. संचालक-२, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. उप संचालक, आरोग्य सेवा तथा उप मुख्य निबंधक, जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
८. जिल्हा शल्य चिकित्सक, (सर्व)
९. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू (सर्व)
१०. वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यू, महानगरपालिका (सर्व)
११. निवडनस्ती (कु.क)